महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र.तशिविकापू/विवि/२०२०/ ९८७२ दिनांक :- 25 MAR 2021

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ महाडिबीटी पोर्टलवर डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना विद्यार्थ्याच्या अर्जावर कार्यवाही करणे बाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ महाडिबीटी पोर्टलवर डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना अर्जामध्ये काही अनियमितता आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित संस्थेच्या प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना संबधित विद्यार्थी संस्थेच्या वसतिगृहामध्ये राहत असल्याबाबत शहानिशा करावी, खात्री करण्यात यावी अन्यथा अशा प्रकारचे अर्ज मंजूर करण्यात येऊ नये याबाबत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करतांना काही अनियमितता आढळल्यास शासनाकडून विद्यार्थ्यास मंजूर झालेली डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्याची रक्कम शासनास परत करण्यात येईल असे संस्थेच्या प्राचार्यांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) या कार्यालयामध्ये सादर करावे.

25/3/21

(मा.रा.जाधव)
सहा संचालक (तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे